19 OCT 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दोन डोस घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात प्रवेश

## शिवाजी विद्यापीठाचा निर्णय : इतरांसाठी ऑनलाईन पर्याय

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने राज्य शासनाने सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत आणि स्वयंअर्थसाहाय्यती विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग उद्या, बुधवार (दि. २०)पासून सुरू करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाने विविध अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्न महाविद्यालयांतील अंतिम वर्षाचे वर्ग पहिल्यांदा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

कोरोना लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच ऑफलाईन वर्गात प्रवेश दिला जाणार आहे. एक डोस घेतलेल्या आणि इतर विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय उपलब्ध करून दिला जाणार आहे.

राज्य शासनाने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे वर्ग सुरू करण्याबाबतचा आदेश दि. १३ ऑक्टोबरला काढला. विद्यापीठ, महाविद्यालयांचे वर्ग ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेने सुरू करण्याबाबत स्थानिक प्राधिकरणांशी विचारविनिमय करून विद्यापीठांनी त्यांच्या पातळीवर निर्णय घ्यावा, अशी सूचना शासनाने केली आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाने उद्या, बुधवारपासून पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे अंतिम वर्षाचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

सोशल डिस्टन्सिंग, सॅनिटायझर, मास्कचा वापर, आदी कोरोनाबाबतच्या नियमांचे पालन (पान १० वर)

# दोन डोस घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात मिळणार प्रवेश

(पान १ वरून) करून वर्ग सुरू करावेत. लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच वर्गात प्रवेश द्यावा, अशी सूचना महाविद्यालयांना करण्यात आली आहे.

दरम्यान, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयांमध्ये दि. ४ ऑक्टोबरपासून अकरावी, बारावीचे वर्ग सुरू झाले आहेत. पदवीचे वर्ग सुरू करण्याबाबत विद्यापीठाच्या सूचनेनुसार तयारी करून महाविद्यालये सज्ज झाली आहेत. कोल्हापूर शहरातील काही महाविद्यालयांमध्ये सोमवारी वर्गांची स्वच्छता, सॅनिटायझेशनचे काम सुरू होते.

**पहिल्यांदा आरोग्य केंद्रात नोंद करावी लागणार**

विद्यापीठातील विविध अधिविभागांमधील वर्ग सुरू करण्याबाबत सोमवारी विभागप्रमुखांची बैठक घेण्यात आली. कोरोना नियमांचे पालन करण्यासह विविध सूचना यावेळी करण्यात आल्या आहेत. अधिविभागातील विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रात पहिल्यांदा लसीचे किती डोस घेतले आहेत, त्याची नोंद करावी लागणार आहे.

दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्याबाबतचे प्रमाणपत्र दिले जाईल. या विद्यार्थ्यांना वर्गात प्रवेश मिळणार असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले. एक डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांची नोंद करून घेण्यात येईल. त्यांच्यासाठी सध्या ऑनलाईन शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. वसतिगृहे सुरू करण्याबाबत शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

19 OCT 2021 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोरोना नियमांचे पालन करूनच विद्यार्थ्यांना अधिविभागात प्रवेश द्यावा

## कुलगुरूंच्या उपस्थितीत अधिविभाग प्रमुखांची बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालये, अधिविभाग बुधवार, २० ऑक्टोबर रोजी सुरू होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर शासन, जिल्हा प्रशासनाच्या कोरोना नियमांचे तंतोतंत पालन करून अधिविभागात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा, अशा सूचना विद्यापीठातील अधिविभाग प्रमुखांना बैठकीत देण्यात आल्या.

दीड वर्षानंतर विद्यापीठ संलग्न महाविद्यालये, अधिविभागांच्या शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ बुधवारपासून होणार आहे. पहिल्या टप्प्यात



शिवाजी विद्यापीठातून...

कोरोनाचा प्रादुर्भाव कमी असलेल्या ठिकाणचे विद्यापीठातील अधिविभाग, संलग्न महाविद्यालयांतील अंतिम वर्ष प्रथम सत्राचे नियमित वर्ग सुरू होणार आहेत. याअनुषंगाने सोमवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत सिनेट हॉलमध्ये विद्यापीठातील अधिविभाग प्रमुखांची बैठक झाली. अधिविभागातील अंतिम वर्षाचे वर्ग सुरू करताना कोरोनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे. दोन डोस पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना अधिविभागात प्राधान्याने प्रवेश दिला जावा. अंतिम वर्षाचे ऑफलाईन, ऑनलाईन वर्ग सुरू ठेवण्याबाबत सूचना देण्यात आल्या. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे आदी उपस्थित होते.

पुढारी

# राज्यातील महाविद्यालये उद्यापासून होणार सुरू

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील महाविद्यालये बुधवार, २० ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. यामुळे गेल्या दीड वर्षापासून बंद असलेले कॅम्पस तरुणाईने पुन्हा फुलणार आहेत. सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांचा यामध्ये समावेश आहे. कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना प्रत्यक्ष लेक्चरला हजर राहण्याची मुभा देण्यात आली आहे.

लस न घेतलेल्या विद्यापीठ आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांसाठी विशेष लसीकरण मोहीम राबविली जाणार आहे. वर्ग ५० टक्के क्षमतेने सुरू करावे, याबाबत स्थानिक प्राधिकरणांकडून सल्ला घेण्याच्या सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. महाविद्यालयात उपस्थित राहून शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन सुविधा दिली जाईल. वसतिगृहे टप्प्याटप्प्याने सुरू केली जाणार आहेत. दोन डोस घेतलेल्या अठरा वर्षावरील विद्यार्थ्यांना लोकल पास देण्याचे आपत्ती व्यवस्थापन विभागाचे रेल्वे प्रशासनाला पत्र देण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 OCT 2021
पुण्यनगरी

# रेशीमशास्त्र केंद्राचे कार्य दिशादर्शक : ढवळे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर ऑफ एक्सलन्स इन सेरिकल्चर या केंद्राचे कार्य शेतकऱ्यांसाठी अत्यंत दिशादर्शक स्वरूपाचे आहे, असे उद्‌गार राज्याच्या रेशीम संचालनालयाचे प्रादेशिक संचालक महेंद्र ढवळे यांनी येथे काढले. जिल्ह्यातील रेशीमशेती, गडहिंग्लज येथील अंडीपुंज निर्मिती केंद्र आणि शिवाजी विद्यापीठातील सेंटर ऑफ एक्सलन्स इन सेरिकल्चर आदी विविध उपक्रमांची पाहणी आणि शेतकऱ्यांच्या गाठीभेटी व चर्चा यासाठी ढवळे दोन दिवसांच्या जिल्हा भेटीवर आहेत. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासमवेत सदिच्छा भेटीने या दौऱ्यास सुरुवात झाली. त्यावेळी ते बोलत होते.

महेंद्र ढवळे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या रेशीमविषयक केंद्राने शेतकऱ्यांना शैक्षणिक तसेच प्रात्यक्षिके दाखवून मार्गदर्शन केले आहे. अगदी कोविड-१९ च्या कालखंडातही शेतीशाळेसारखा साप्ताहिक उपक्रम ऑनलाईन राबवून देशभरातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना सातत्याने मार्गदर्शन करण्याची भूमिका घेतली आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांचे योग्य प्रकारे उद्‌बोधन व प्रबोधन करण्याचे महत्त्वाचे कार्य या केंद्राने आणि केंद्राचे संचालक डॉ. ए. डी. जाधव यांनी केले आहे.

याप्रसंगी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते मलबेरी रोप देऊन ढवळे यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. ए. डी. जाधव, जिल्हा रेशीम अधिकारी भगवान खंडागळे आणि गडहिंग्लज रेशीम कार्यालयाचे अनिल संकपाळ आदी उपस्थित होते.

19 OCT 2021
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्य फेन्सिग स्पर्धा २३ पासून

## आमदार ऋतुराज पाटील : क्रीडा क्षेत्राला मिळणार नवी झळाळी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

३२ व्या वरिष्ठ गट राज्यस्तर फेन्सिंग (तलवारबाजी) अजिंक्यपद स्पर्धेच्या आयोजनाचा बहुमान यंदा कोल्हापूरला मिळाला असून, २३ ते २५ ऑक्टोबर या कालावधीत ही स्पर्धा होणार आहे. कोल्हापूर फेन्सिंग (तलवारबाजी) असोसिएशन, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आल्याची माहिती डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात ही स्पर्धा होणार आहे. इपी, फॉईल व सेंबर या तीन प्रकारांमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत राज्यभरातील सुमारे ५०० खेळाडू सहभागी होणार आहेत.

### दिनांक २५ रोजी समारोप

राष्ट्रीय तलवारबाजी संघटनेचे उपाध्यक्ष व महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष, गृह राज्यमंत्री सतेज डी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता स्पर्धेचा समारोप होणार आहे. शिवछत्रपती पुरस्कार विजेते, गुणवंत खेळाडू, स्पर्धेस हजर असलेले पंच आणि सामनाधिकारी, राष्ट्रीय संघटनेवर निवड झाल्याबद्दल पालकमंत्री सतेज पाटील, उदय डोंगरे, अशोक दुधारे यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

19 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रांतिवनातून जागवणार स्मृती

## विद्यापीठात शिल्प, स्वातंत्र्यसैनिकांच्या नामफलकासह अन्य गोष्टी

सकाळ वृत्तसेवा

जरगनगर, ता. १८ : देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होत आहेत. या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात क्रांतिवन उभारले जाणार आहे. यात शिल्प, स्वातंत्र्यसैनिकांचे नामफलक यासह अन्य गोष्टींचाही समावेश असणार आहे. विद्यापीठाच्या गेट क्रमांक ८ मधून आत गेल्यावर डाव्या बाजूला यासाठी जागा निश्चित केली असून लवकरच कामाला प्रारंभ होईल. स्वातंत्र्यवीरांचे स्मरण व्हावे, यासाठी शिवाजी विद्यापीठात क्रांतिवन साकारले जाणार आहे. याचे स्वरुप जरी उद्यानासारखे असले तरी त्याची रचना ही वेगळ्या पद्धतीची आहे. इथे आलेल्या प्रत्येकाला स्वातंत्र्यलढ्याचे स्मरण येथील शिल्पांमधून होईल. आपला इतिहास समजावून घेता येईल. विद्यापीठात प्रवेश करतानाच हे



क्रांतिवन असल्याने प्रत्येकाला ते आतून पाहाता येईल. हे क्रांतीवर सर्व नागरिकांसाठी खुले असणार आहे. या दृष्टिकोनातून याचा आराखडा तयार केला आहे.

### शाहू चित्रप्रदर्शनी आणि वैज्ञानिक प्रयोग प्रदर्शन

विद्यापीठाच्या परिसरात राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारीत चित्रप्रदर्शनी तसेच त्यांच्या वस्तूंचे संग्रहालय होणार आहे. याच ठिकाणी एक ओपन एअर थिएटर उभारण्यात येईल. तेथे वैज्ञानिक प्रयोगांवर आधारित कायमस्वरुपी प्रदर्शन साकारण्यात येणार आहे. विद्यापीठाचा परिसर मोठा असून तेथे विविध प्रकारची जैवविविधता आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून विद्यापीठ परिसराचा पर्यटन आराखडा बनवण्याचे काम सुरू आहे.

### अध्यासनाच्या इमारती

विद्यापीठात मुलींचे आणखी एक वसतिगृह उभारण्यात येणार आहे. तसेच विविध अध्यासनांसाठी स्वतंत्र इमारती बनवण्याचाही प्रस्ताव आहे. यातील महावीर अध्यासन केंद्राची स्वतंत्र इमारत बांधली जाणार आहे.

> देशाचा स्वातंत्र्यसंग्राम हा भावी पिढ्यांना प्रेरणादायी आहे. स्वतंत्र्यासाठी ज्यांनी जीवनाचा त्याग केला, त्यांचे जीवनप्रवास सर्वांनाच मार्गदर्शक ठरणार आहे. हा विचार करून विद्यापीठात क्रांतिवन साकारणार आहेत. तरुण, तरुणींना ऊर्जा आणि प्रेरणा देणारे हे वन ठरेल, असा यामागचा विचार आहे.
> – डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ.

### असे असेल क्रांतिवन

- ग्रानाइटमधील स्वातंत्र्यसैनिकांचा नामफलक
- स्वातंत्र्यलढ्याची महती सांगणारे शिल्प
- ज्येष्ठ नागरिकांसाठी बैठक व्यवस्था
- सौरऊर्जेवर विद्युत रोषणाई
- आकर्षक पुष्पसजावट
- विविध प्रकारची झाडे

सकाळ

# मोडी लिपीचे संवर्धन गरजेचे : वसंत सिंघन

सकाळ वृत्तसेवा

उचगाव, ता. १८ : मोडी तसेच अन्य दुर्मिळ लिपींचा अभ्यास करणे आवश्यक आहे. या भाषांचे संवर्धन, जतन हे अभ्यासातूनच होऊ शकते, असे प्रतिपादन मोडी तज्ज्ञ वसंत सिंघन यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व इतिहास विभागाच्या व्याख्यानमालेत ते बोलत होते.

यावेळी सिंघन म्हणाले, ''देशातील ६४ लिपी लोप पावत चालल्या आहेत. अर्धमागधी, मोडी, फारशी, पांडू व ब्राम्ही ही त्याची उदाहरणे आहेत. या लिपींचा अभ्यास केल्यावर इतिहास उलगडतो. म्हणून या लिपींचा अभ्यास होणे आवश्यक आहे. यासाठी विद्यापीठाने प्रमाणपत्र अभ्यासक्रमाबरोबर पदव्युत्तर व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम राबविणे गरजेचे आहे.'' इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात लिपी वाचणारे, जाणणारे व देवनागरीत भाषांतर करणाऱ्या तज्ज्ञ निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. डॉ. सुमन बुवा यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. यशोधन बोकील यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. रवींद्र खैरे यांनी आभार मानले. अरविंद पालके यांनी सूत्रसंचालन केले.

तरुण भारत

# नियमांचे पालन करीत अधिविभाग सुरू करा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत अधिविभाग व महाविद्यालये बुधवार २० ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. या पार्श्वभूमीवर सोमवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत अधिविभागप्रमुखांची बैठक घेवून शासन नियमानुसार अधिविभाग सुरू करण्याच्या सूचना विद्यापीठ प्रशासनाव्दारे देण्यात आल्या. शासन नियमांनुसार विद्यापीठ अधिविभाग बुधवार २० ऑक्टोबरपासून सुरू होत आहेत. ५० टक्के क्षमतेचे पालन करण्यासाठी पदव्युत्तर अंतिम वर्षाचे वर्ग सुरू करावे. तसेच कोरोनाचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना वर्गात प्रवेश द्यावा. वर्गात विद्यार्थ्यांना एकआड एक बसवून अध्यापन करावे, यासह अन्य सूचना दिल्या. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह सर्व अधिविभागप्रमुख उपस्थित होते.

19 OCT 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धा शनिवारपासून

## सतेज पाटील यांच्या प्रयत्नातून कोल्हापूरला यजमानपद, ५०० खेळाडू होणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या जिजाऊसाहेब बहुउद्देशिय सभागृहात येत्या शनिवारपासून (दि. २३) ३२ व्या वरिष्ठगट राज्यस्तर फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. सोमवारपर्यंत (दि. २५) सुरु राहणाऱ्या या स्पर्धेच्या आयोजनाचा यंदा कोल्हापूरला मान मिळाला आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठ, डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ आणि कोल्हापूर फेन्सिंग (तलवारबाजी) असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धेचे संयोजन केले जाणार असल्याचे, डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त व आमदार ऋतुराज पाटील यांनी निवेदनाद्वारे कळवले आहे.



संग्रहित

निवेदनात म्हटले आहे, की ईपी, फॉईल व सेंबर या तीन प्रकारात होत असलेल्या तलवारबाजी स्पर्धेत राज्यभरातील ५०० खेळाडू सहभागी होत आहेत. राष्ट्रीय तलवारबाजी संघटनेचे उपाध्यक्ष व महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष तथा गृहराज्यमंत्री सतेज पाटील यांनी केलेल्या प्रयत्नातून कोल्हापूरला स्पर्धा आयोजनाचे यजमानपद मिळाला आहे. शनिवारी दुपारी १२ वाजता आमदार ऋतुराज पाटील, आमदार चंद्रकांत जाधव, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राकेशकुमार मुदगल यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन होईल. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गर्दी टाळण्यासाठी स्पर्धेतील प्रत्येकी दिवशी १५० खेळाडू, ३५ पंच, सामनाधिकारी व राज्य संघटनेचे पदाधिकारी इतकेच लोक स्पर्धास्थळी उपस्थित राहतील. दररोज सकाळी ९ ते २ वाजेपर्यंत पुरुष व दुपारी २ ते सायंकाळी ७ यावेळेत महिला खेळाडूंच्या स्पर्धा होतील. प्रत्येक दिवसाच्या स्पर्धा संपल्यानंतर यशस्वी खेळाडूंना पदके देऊन गौरवले जाईल. स्पर्धेचा समारोप सोमवारी (दि. २५) दुपारी ४ वाजता सतेज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल, असेही निवेदनात नमुद केले आहे.